# वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs)

प्र. १. शिबिराचा कालावधी काय आहे?
उत्तर – एका शिबिराचा कालावधी ३० दिवसांचा असतो. प्रशिक्षणार्थी त्याच्या इच्छेनुसार हा कालावधी वाढवून घेऊ शकतो.

प्र. २. शिबीराची मासिक फी किती आहे?
उत्तर – शिबीराची मासिक फी रू. ७८९०/- आहे. सुरक्षा रक्षक प्रशिक्षण फी रू. ६५००/- (या फी मध्ये जेवण, निवास व प्रशिक्षण हे सर्व मिळते. )

प्र. ३. जेवणाची सोय काय आहे?
उत्तर – आमचे स्वत:चे मेस असल्यामुळे जेवणाची सोय उत्तम आहे. जेवणात एक वेळचा नाष्टा व दोन वेळचे पोटभर जेवण दिले जाते. नाष्टयामध्ये दररोज एक ग्लास दूध सुद्धा दिले जाते. दर शनिवारी विशेष फीस्ट असते. मेस आठवडयातील साती दिवस पूर्ण वेळ चालू असते.

प्र.४. प्रशिक्षणासाठी येताना कोणती कागदपत्रे आणावी लागतात?
उत्तर - प्रशिक्षणासाठी येताना विद्यार्थ्याने खालील कागदपत्रे आणावयाची आहेत.

क) १०वी व १२ (जे लागू असेल त्याप्रमाणे) ची गुणपत्रिका व सर्टिफिकेटची छायांकित प्रत.
ख) आधार कार्ड ची छायांकित प्रत.
ग) डॉक्टर कडून वैद्यकीय फिटनेस सर्टिफिकेट
घ) एक पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो.
ङ) कोविड -१९ लस घेतलेले प्रमाणपत्र.

प्र. ५. भरतीसाठी जाताना कोणती कागदपत्रे लागतात?

उत्तर- प्रशिक्षणाच्या दरम्यान याबद्दल पूर्ण माहिती देण्यात येते. तसेच ही यादी या वेबसाईटवर सुद्धा टाकलेली आहे. कागदपत्रांबाबत खालील मुद्दयांकडे लक्ष द्यावे.

क) भरतीदरम्यान कागदपत्रांची पडताळणी करताना कागदपत्रे त्याच ARO च्या कार्यक्षेत्रातील असली पाहिजेत.
ख) भरतीदरम्यान कागदपत्राची सत्यप्रत जवळ असली पाहिजे.
ग) पासपोर्ट आकाराचे रंगीत १६ फोटो हे दोन महिन्याच्या आतील काढलेले असावेत.

प्र.६. ॲकॅडमी मध्ये मैदानी व लेखी परीक्षेच्या तयारीसाठी काय सोय आहे?

उत्तर- ॲकॅडमी मध्ये रनिंग ट्रॅक, लांब उडी आखाडा, ९ फुट खड्डा, पुल अप साठीचे बीम, चढण्यासाठी रस्सा, शॉट पुट चे गोळे वगैरे सर्व सोई उपलब्ध आहेत. तसेच भरपूर अनुभव असलेले माजी सैनिक प्रशिक्षक उपलब्ध आहेत. लेखी परीक्षेच्या तयारीसाठी प्रत्येक विषयासाठी अनुभवी सिव्हिल प्रशिक्षक उपलब्ध आहेत. ॲकॅडमी मधये मागील व अपेक्षित प्रश्नपत्रिका सोडविण्याचा भरपूर सराव करून घेतला जातो ज्यामुळे खात्रीलायक यश मिळते.

प्र. ७. भरतीकरिता तुम्हीच घेऊन जाणार का?

उत्तर- भरती करिता ॲकॅडमी तर्फे नेले जात नाही. मुले स्वत: तिथे जातात. परंतु आमचे एक प्रशिक्षक सहसा तेथे असतात.

प्र.८. भरतीची १००% गॅरन्टी देता का?

उत्तर– भरतीची १००% गॅरन्टी कोणीही देऊ शकत नाही. जे देतात त खोटे आश्वासन देऊन आपली फसवणूक करत असतात. भरतीची प्रिक्रिया पूर्णपणे पारदर्शक व foolproof असून कोणत्याही प्रकारची हेराफेरी चालत नाही. आमच्या ॲकॅडमीचा उद्देश मुलाला इतका सक्षम बनविण्याचा आहे कि त्याला दुसऱ्या कोणच्या आश्वासनाची वा मदतीची गरजच भासू नये.

प्र.९. राहण्याची सोय कशी आहे?

उत्तर- ॲकॅडमी मध्ये राहण्याची उत्तम सोय आहे. प्रत्येकाला कॉट, गादी, पलंगपूस, चादर व मच्छरदाणी दिली जाते. तसेच सामान ठेवण्यासाठी कपाट सुद्धा दिले जाते. याचे फोटो या वेबसाईटच्या फोटो गॅलरीमध्ये बघता येतील.

प्र.१०. पुढील शिबित कधी पासून सुरू होणार आहे?उत्तर- शिबिरांचे वेळापत्रक वेबसाईट च्या MCA Course schedule टॅब खाली दिल आहे. परंतु ॲकॅडमी सतत चालू असल्यामुळे प्रशिक्षणार्थीला कोणत्याही दिवशी प्रवेश घेता येतो व त्याचा प्रशिक्षण कालावधी त्या दिवसापासून मोजला जातो. (Vacancy असेल तर)

प्र.११. पुढील रॅली किंवा ओपन भरती कधी आहे?

उत्तर – आम्हाला भरतीसंबंधी माहिती मिळाली की लगेचच आम्ही ती आमच्या वेबसाईटच्या Current Expected Enrolment and Rally Programme या टॅब वर टाकतो.

प्र.१२. भरती होईपर्यंत मुलाला तुमच्या ॲकॅडमी मध्ये ठेऊ शकता का?

उत्तर- तीन महिने प्रशिक्षण केल्यावर मुलाची क्षमता समजते. त्यामुळे भरती होईपर्यंत मुलाला प्रशिक्षण केंद्रात ठेवण्याची गरज नाही.

प्र.१३. हे प्रशिक्षण मुलींसाठी सुद्धा आहे का?

उत्तर- हे प्रशिक्षण मुलींसाठी सुद्धा आहे. परंतु मुलींची निवासाची सोय नसल्यामुळे त्यांना अनिवासी पद्धतीने प्रशिक्षण घ्यावे लागेल. आणि जर मुली ग्रुप ने म्हणजेच ३ किंवा ४ एकत्र आल्या तर पेमेंट वर भाडयाच्या Room ची व्यवस्था केली जाते.

प्र. १४. आर्मी व पोलीस भरतीसाठीचे प्रशिक्षण एकत्रच चालते का?

उत्तर– आर्मी व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण मैदानी तयारी साठी एकत्र चालते. परंतु लेखीचे काही विषय वेगळे असल्यामुळे त्यासाठी दोन वेगवेगळे बॅचेस केले जातात.

प्र. १५. प्रशिक्षण चालू असताना भरतीसाठी जावे लागल्यास त्या प्रशिक्षण कालावधीचे काय होते?

उत्तर- प्रशिक्षणा दरम्यान भरतीसाठी गेल्यास प्रशिक्षणाचा कालावधी तेवढया दिवसांसाठी कोणतेही जास्तीचे शुल्क न आकारता वाढविला जातो.

प्र. १६. माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी फी मध्ये काही सवलत आहे का?

उत्तर– माजी सैनिकांच्या पाल्यांना ॲकॅडमीची पावती व सर्टिफिकेट दाखविल्यास जिल्हा सैनिक कार्यालयाकडून रू. २०००/- पर्यंत ची रक्कम परत मिळण्याची सुविधा आहे.

प्र.१७. एका आर्मी रिक्रूटिंग ऑफिस (ARO) क्षेत्रातील मुलगा दुसऱ्या ARO क्षेत्रातील भरतीसाठी उतरू शकतो का?

उत्तर- सहसा ही परवानगी दिली जात नाही. एखाद्या पदाकरिता ही परवानगी असेल तर माहीती पत्रकातून याचा स्पष्ट उल्लेख केला जातो.

प्र. १८. १२वी MCVC केलेला प्रशिक्षणार्थी आर्मी भरतीसाठी उतरू शकतो का?

उत्तर- MCVC हे qualification आर्मी भरतीसाठी अमान्य आहे.

प्र. १९. प्रशिक्षण फी धनादेशाद्वारे भरली तर चालते का?

उत्तर– प्रशिक्षण फी आमच्या खात्यावर भरून त्याप्रमाणे आम्हाला सूचित केले तरी चालते. यासाठी आमच्या खात्याची माहीती खालील प्रमाणे आहे.

क. खातेदाराचे नाव - MESCO Enterprises, Satara.
ख. बँकेचे नाव - Central Bank of India, Satara Branch
ग. खाते क्रमांक - 1919834925
घ. IFC Code - CBIN0281516